# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



प्रेसनोट क्रमांक :- १२६-२३ दिनांक :- १७/०४/२०२३


## रिक्षा व मोटर सायकल चोरी करणा-या आरोपीतास अटक करुण ०५ गुन्हयांची उकल तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

विरार वाहतुक शाखेचे पो.उप.नि. के. सुर्यवंशी यांनी तुळींज पोलीस ठाणेत कार्यरत असलेले पो.हवा. मोरे यांचेशी संपर्क साधुन माहिती दिली कि, बनावट नंबर प्लेटचा वापर करून रिक्षा चालवताना एक इसम मिळुन आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदरबाबत तपास केला असता सदर रिक्शाच्या चोरीबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. सदरची रिक्षा इसम नामे शिशकुमार गुप्ता याचे ताब्यात असल्याचे निदर्शनास आल्याने तात्काळ गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्याचेकडे कौशल्यापुर्ण तपास केला असता त्याने सदरची रिक्शा ही त्याचा मित्र प्रकाश त्रिवेदी याचेकडुन घेतल्याचे सांगुन आणखी दोन चोरीच्या रिक्शा त्याने व त्याचा मित्र राकेश याने विरार येथील इसमांना विक्री केल्याची माहिती प्राप्त झाल्याने इसम नामे शिशकुमार गुप्ता यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याचे साथीदार प्रकाश त्रिवेदी ऊर्फ मारवाडी याचा तांत्रिक विश्लेषाद्वारे शोध घेवुन त्यास मुंबई, अंधेरी येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने व त्याचा साथीदार आरोपी नामे १) शिवकुमार हरिहर गुप्ता, रा. जीवदानी पाडा, विरार पुर्व २) प्रकाश पोतराज त्रिवेदी, रा. रुम नं. ०३ क्रिष्ण चाळ कुंभारपाडा विरार प. ता. वसई जि.पालघर यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन तुळींज पोलीस ठाणे अभिलेखावरील ०२ तसेच विरार पोलीस ठाणे अभिलेखावरील ०३ गुन्हे असे एकुण ०५ गुन्हे उघड करुण एकुण ०४ रिक्षा व ०१ मोटार सायकल असा एकुण ०५,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, तुळींत विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, म्हाळु आव्हाड, दशरथ वाव्हुळे,उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे,पो.अंम. छपरीबन, राऊत तसेच विरार वाहतुक शाखेचे पो.उप.नि. मधुकर सुर्यवंशी, पो.हवा. संतोष चकोर, पो.अंम. योगेश भारुडे यांनी केली आहे.



----oooo----